**मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, कस्तर, न्यायालय अंबाजोगाई जि.बीड**

कि.दि.अर्ज नं.३३/२०२६.

**अर्जदार** :- दिलीपराव पिता भगवानराव लोमटे व ईतर

Exh-11/C

Order
Read & Recorded
Sd/-

**विरुध्द**

**गैरअर्जदार**:- ... कोणीही नाही. ......

**प्रकरण** :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

**प्रस्तुत प्रकरणात अर्जदार क्र.१ ते ४ चा पुरावा म्हणुन अर्जदार क्र.२ चे सरतपासणीचे शपथपत्र खालील प्रमाणे सादर आहे.**

**–: श प थ प त्र :–**

मेघराज

मी, मेघराज पिता दिलीपराव लोमटे वय ४५ वर्ष धंदा शेती, रा.काळा मारुती मंदिर जवळ, अंबाजोगाई जि.बीड, प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, प्रस्तुत प्रकरणात मी अर्जदार क्र.२ असुन आम्ही अर्जदार क्र.१ ते ३ हे शहर कसबे अंबाजोगाई जि.बीड येथील रहीवाशी असुन अर्जदार क्र.१ हे माझे वडील, अर्जदार क्र.३ माझा भाऊ आणि अर्जदार क्र.४ माझी बहिण आहे.

अर्जदार क्र.१ ची पत्नी म्हणजेच आम्हा अर्जदार क्र.२ ते ४ यांच्या जन्मदात्या आई नामे दैवशाला भ्र.दिलीप लोमटे रा.अंबाजोगाई जि.बीड या दिनांक ०१/०५/२०२५ रोजी राहते स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई येथे मयत झाल्या आहेत.

Asst. Supdt.
Jt. Civil Court (J.D.)
Ambajogai

पान नं.२ वर ...

Scanned by CamScanner

मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे यांच्या माघारी यातील अर्जदार क्र.१ मयताचे पती, आम्ही अर्जदार क्र.२ व ३ मयताची मुले आणि अर्जदार क्र.४ मयताची मुलगी या नात्याने कायदेशिर वारस आहोत. आम्हा अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या शिवाय मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे यांचे माघारी अन्य कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

आम्हा अर्जदारांना शासकिय आणि निमशासकिय कार्यालयीन कामा करीता आम्ही अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे यांचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता आम्ही मा.न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे.

आम्ही मा.न्यायालयात दाखल केलेल्या सदर प्रकरणाच्या अनुशंगाने मा.न्यायालयाचे वतीने दिनांक १७/०१/२०२६ रोजीचे दै.अंबाजोगाई वार्ता या वृत्तपत्रा मध्ये जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला आहे, त्यात दिलेल्या मुदतीत अथवा मुदती नंतर आजतागायतही सदर प्रकरणी कोणीही, कसल्याही प्रकारची हरकत वा उजर दाखल केलेलानाही.

करीता आमचा अर्ज मंजूर करण्यात यावा आणि मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे रा.अंबाजोगाई जि.बीड यांचे आम्ही अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशिर वारस असल्याचे वारसा प्रमाणपत्र आम्हा अर्जदारांच्या हक्कात देण्यात यावे.

Asst. Supdt.
Jt. Civil Court (JD)
Ambajogai

पान नं.३ वर ....

Scanned by CamScanner

सबब हे शपथपत्र दिले ते खरे आहे.फ.

दिनांक:१२/०३/२०२६. **प्रतिज्ञक,**

मेघराज

मेघराज पिता दिलीपराव लोमटे

रा.काळा मारुती मंदिर जवळ, अंबाजोगाई

ता.अंबाजोगाई जि.बीड.

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, प्रस्तुतच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर माझ्या माहिती आणि समजुती प्रमाणे खरा व बरोबर असुन यावर मी आज माझ्या समजुन उमजुन स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

दिनांक:१२/०३/२०२६. **प्रतिज्ञक,**

मी प्रतिज्ञकास ओळखतो.

मेघराज

मेघराज पिता दिलीपराव लोमटे

रा.काळा मारुती मंदिर जवळ, अंबाजोगाई

ता.अंबाजोगाई जि.बीड.

**ॲड.ओम ए.लोंढाळ,**

**अंबाजोगाई.**

शपथपत्र

शपथेदर सत्य निवेदन करतो की,

माझे नांव मेघराज पि. दिलीपराव लोमटे

४५ वर्षे, व्यवसाय शेती

अंबाजोगाई

ओम. ए. लोंढाळ

यांना विधिज्ञ

हे ओळखतात.

१२/३/२६

Asst. Supdt.
Jt. Civil Court (JD)
Ambajogai

मेघराज